कुटुंब कल्याण कार्यक्रमाच्या अंमलबजावणी करीता निर्माण केलेल्या ३७ अस्थायी पदांना सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षात दि. ०१/१०/२०१७ ते दि. ३१/१२/२०१७ या कालावधीकरीता मुदत वाढ देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः अस्थायी २०१७/२७१/प्र.क्र.१०५/कु.क.

१० वा मजला, बी विंग, गो.ते.रुग्णालय संकुल इमारत
नवीन मंत्रालय, लो.टि.मार्ग, मुंबई ४०० ००१
तारीख: १७ नोव्हेंबर, २०१७

<u>वाचा -</u>

१) **सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र. अस्थायी २०१७/२७१/प्र.क्र. १०५/कु.क., दि. २३ मार्च, २०१७**

२) **सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांचे क्र.संआसे/आस्था/टे-३/कक्ष-५/३७ अपदे/५१२४-२५, दि.१८.१०.२०१७ चे पत्र.**

३) **वित्त विभाग, शासन निर्णय क्र. पदनि-२०१६/प्र.क्र.०८/आ.पु.क., दि. ०३/१०/२०१७.**

<u>प्रस्तावना -</u>

कुटुंब कल्याण कार्यक्रमांच्या अंमलबजावणीकरीता कार्यरत असलेल्या ३७ अस्थायी पदांना संदर्भ क्र. १ अन्वये दि. ०१/०३/२०१७ ते दि.३०/९/२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. सन २०१७-२०१८ या वर्षाकरीता ३७ अस्थायी पदांना दि. १/१०/२०१७ ते दि.३१/१२/२०१७ या कालावधीकरीता मुदतवाढ देण्याबाबतचा प्रस्ताव संदर्भ क्र.२ अन्वये शासनास प्राप्त झाला आहे. संदर्भ क्र.३ अन्वये वित्त विभागाने प्रशासकीय विभागातील मंजूर अस्थायी पदांना दि. १/१०/२०१७ ते दि.३१/१२/२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यास मंजूरी दिली आहे . त्यानुषंगाने सदर ३७ अस्थायी पदांना दि. १/१०/२०१७ ते दि.३१/१२/२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय-

कुटुंब कल्याण कार्यक्रमांतर्गत प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रमांतर्गत २२११ लेखाशीर्षाखाली कार्यरत असलेल्या पुढील विवरणपत्रात नमूद ३७ अस्थायी पदांस दि.०१/१०/२०१७ ते ३१/१२/२०१७ पर्यंत पुढे चालू ठेवण्यास या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात येत आहे.

पदांचे विवरणपत्र

अ.क्र.	पदनाम	वेतनश्रेणी (ग्रेड पे) (रुपये)	अस्थाई पदांची संख्या
१	सह संचालक आरोग्य सेवा	१५,६००-३९,१०० (७,६००)	१
२	उप संचालक आरोग्य सेवा	१५,६००-३९,१०० (७,६००)	२
३	सांख्यिकी अधिकारी	९,३००-३४,८०० (४,४००)	१
४	लघुलेखक उच्च श्रेणी	९,३००-३४,८०० (४,४००)	१
५	सहाय्यक अधिक्षक	९,३००-३४,८०० (४,२००)	४
६	वाहन चालक	५,२००-२०,२००(१,९००)	४
७	सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी, कुटुंब कल्याण माताबाल संगोपन आणि शालेय आरोग्य, (वैद्यकीय) (वर्ग-१)	१५,६००-३९,१०० (६,६००)	२३ (१७ जिल्हास्तर व ६ राज्य स्तर)
८	सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण, मुंबई (वर्ग-१)	१५,६००-३९,१०० (६,६००)	१
	एकूण		३७

३. उपरोक्त विवरणपत्रातील नमूद ३७ पदांवरील खर्च पुढील लेखाशीर्षाअंतर्गत भागविण्यात येईल. सदर पदांवरील खर्चाची तरतूद शासनाच्या सन २०१७-२०१८ च्या मंजूर अर्थसंकल्पिय तरतूदीतून केली जाईल.

१) अ.क्र.१ ते ६ मधील नमूद पदांकरीता लेखाशीर्ष:-

मागणी क्र. आर-१, मुख्य लेखाशीर्ष-२२११,००१- संचालन व प्रशासन, (०१) राज्य कुटुंब कल्याण केंद्र, १०० % केंद्र पुरस्कृत योजना-(०१)(०२), राज्य कुटुंब कल्याण केंद्र (२२११ ००३१)

२) अ.क्र.७ व ८ मधील नमूद पदांकरीता लेखाशीर्ष :-

मागणी क्र.आर-१, मुख्य लेखाशीर्ष-२२११ कुटुंब कल्याण, ००१- संचालन व प्रशासन, (०१) कुटुंब कल्याण केंद्र, १०० टक्के केंद्र पुरस्कृत योजना, (०१)(०३) जिल्हा कटुंब कल्याण केंद्र (२२११ ००५१)

४. सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/आपुक, दि.०३/१०/२०१७ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१११७१२५७३७८११७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ujwala Arun Ransing

Digitally signed by Ujwala Arun Ransing
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a7788b3b31e2d9269bcbfd9588a6ee4771341780133d295a56dd4ef476977773, serialNumber=3b8f98f1c182bf458a4deee399a7241b5044aeb09c097bc6d28b58709fe8ef0d, cn=Ujwala Arun Ransing
Date: 2017.11.18 17:03:12 +05'30'

(उज्वला अ. रणसिंग)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. प्र महालेखापाल, महाराष्ट्र -१/२ (लेखापरीक्षा/(लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर
२. अधिदान व लेखा कोषागार, मुंबई
३. आयुक्त, तथा संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
४. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
५. अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण, पुणे (५ प्रती) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
६. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
७. वित्त विभाग (व्यय-१३/आपुक) मंत्रालय, मुंबई
८. निवड नस्ती /कु.क.